

# मुंबईसाठी कार्यसूची

## शारदा द्विवेदी

जेव्हा मी आणि राहुल मेह्रोत्रा 'मुंबई : शहरांतील शहरे' हा लेख लिहीण्यासाठी संशोधन करीत होतो. त्यावेळी आम्ही शेकडों छायाचित्रांचा अभ्यास केला. रूड्यार्ड किपलिंगने 'शहरांची माता' असं ज्या शहराला गौरविलं होतं त्या सुंदर व वैभवशाली शहराची काही दशकांत अशी दुर्दशा कां व्हावी असा प्रश्न सतत मनांत येत राहिला. कांही गोष्टी अगदी उघड होत्या, कांही चट्कन् लक्षांत न येणाऱ्या होत्या. एक गोष्ट स्पष्ट होती. ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञांनी व नागरी नियोजकांनी या शहरांसाठी ज्या दूरदर्शीपणाने योजना तयार केल्या होत्या. त्यावर धूळ साचत होती. कारण आपले निवडून आलेले प्रतिनिधी सातत्याने व अक्षम्यपणे शहराच्या सर्व आघाड्यांवर दुर्लक्ष करीत होते. त्याचप्रमाणे तर्कशुध्द विकसनाच्या योजनांत अडथळे आणीत या योजना निष्फळ करीत आले.

या शहराला असंख्य समस्या भेडसावीत आहेत. त्यांचा सतत उच्चार करीत राहिले तर या समस्यांवर तोडगा सांपडू शकेल. बेट असलेल्या या शहराचा आणखी विस्तार करायला परवानगी द्यायची नाही असे ठरवूनसुध्दा व नवीन मुंबईचा विकासाचा प्रस्ताव असताना तो न जुमानता, जेव्हा 1960 च्या मध्याला नरिमन पॉईंट व कफ् परेडला तारतम्य न बाळगता समुद्र मागे हटवून जमीन मिळविण्यात आली तेव्हां या शहराचा ऱ्हास सुरू झाला. बांधकाम व्यावसायिक (बिल्डर्स), राजकारणी यांच्यामध्ये निर्लज्ज परस्पर सबंध निर्माण झाले हे स्पष्टपणे सिध्द झाले. त्यामुळे शहरामध्ये परवडतील अशी घरें (जागा, गाळा, फ्लॅट) मिळणे बंद झाले. आणि निगरगट्टपणे भ्रष्टाचार सर्वकडे सुरू झाला. यानंतर नागरी पायाभूत घटकांमध्ये क्रमाक्रमाने व अविचल (स्टेडी) बिघाड सुरू झाला आणि पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्यांप्रमाणे झोपडपट्टीला राजरोस प्रोत्साहन देण्यास सुरवात झाली कारण या मतांच्या पेढ्या होत! आजतागायत हे चालू आहे. याबरोबर मोठ्या प्रमाणावर कामगारांचे लोंढेच्या लोंढे येऊन लोकसंख्या नियंत्रणाबाहेर वाढूं लागली. शहराच्या वाढीवर नियंत्रण व विकसन यासाठी केलेल्या तर्कशुध्द योजनात राजकारण्यांकडून तीव्र ढवळाढवळ व त्यांना विरोध होऊं लागला. ही एक शरमेची बाब आहे की 60 वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर शहरांतील 60% जनता झोपडपट्टीत व पदपथावर राहते. स्वत:चे हितसंबंध जपणाऱ्यांकडून यांतील बऱ्याच वस्त्यांना कायदेशीरपणा मिळवून दिला गेला.

हे वादाचे महत्वाचे मुद्दे सोडविण्यांसाठी आतां एकात्मक 'मास्टर' योजना तयार करून तिचे कायद्यांत रूपांतर करणे

जरूरीचे आहे. म्हणजे त्यांत तऱ्हेवाईकपणें बदल करता येणार नाहीत. पूर्ण बेट-शहर व महानगरचा परिसर यांची तुकड्या-तुकड्यांनी विकसन योजना न आंखतां सर्व समावेशक विचार व्हायला हवा. उदाहरणार्थ फक्त बेट-शहरांत गिरण्यांचे भूखंड, पोर्ट ट्रस्ट धरून पूर्व किनारपट्टी, रेल्वेमार्ग, महानगरपालिकेचे भूखंड, मिठागरें यांचा सर्वंकष विचार करून संकुलित योजना करून अंमलांत आणली तर निकडीची गरज असलेली परवडतील अशी घरें, विशेषत: झोपडवासीयांना आणि कमी मिळकत असलेल्यांना देता येतील, शिवाय या सर्व क्षेत्राचे पुनरूज्जीवन पण होईल. इतर गोष्टींबरोबर यामुळें उत्तर-दक्षिण सरळ रेषेत (लांबचा) प्रवास करणाऱ्यांना व्यवहार्य अशा घराजवळच नोकरी-धंदा करण्याच्या संधी मिळतील.

परवडतील अशी घरें पुरवतां येतील असे करतांना त्यांचेबरोबर नाशकारक व अनावश्यक असलेले 'नागरी जमीन कमाल मर्यादा' (अर्बन लँड सेलिंग अॅक्ट) सारखे कायदे रद्दबातल करावयास हवेत. याचवेळी मतांच्या पेढ्यांचे राजकारण खेळणाऱ्यांकडून वेगांत वाढणाऱ्या झोपडपट्ट्यांना सुकरपणे वाढून देण्यास आळा बसावा म्हणून, हे अनिवार्य आहे. राजकारण्यांनीं अडथळा आणूं नये म्हणून अतिक्रमण करणाऱ्यांचा मतदानाचा अधिकार कायद्याने काढून घेऊन त्यांना कुठल्याही सुविधा देण्याचे बंद करावयास हवे.

बांधकाम व्यावसायिक जरी सांगत असले (त्यांची सत्ताधाऱ्यांबरोबरची युती तोडावयास हवी) की पायाभूत घटक या बेट-शहरांत पुरेसे आहेत तरी आपण हे लक्षांत घ्यायला पाहिजे की वीज, दूरध्वनी, तारायंत्र, रेडिओ, टी.व्ही. च्या केबल लाईन्स् यांचा अपवाद वगळता आपण स्वातंत्र्यपूर्व काळात सांडपाण्याचा निकाल लावण्यासाठी गटारे व बसवलेले नळ आणि पाणीपुरवठा करणाऱ्या पद्धती, या ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या सुविधांवरच जगत आहोत. पायाभूत घटकांचे सबलीकरण करणे यास अग्रक्रम द्यावयास हवा, आपल्याला गरज आहे तेवढी वीज व पाणी यांचा पुरवठा पुरेसा नाही. सार्वजनिक स्वच्छतागृह गलिच्छ आहेत, त्यांना स्वच्छ ठेवले जात नाही व त्यांची संख्या फारच अपुरी आहे.

सार्वजनिक वाहतुकीची साधने बहुसंख्य जनतेला पुरविणे याला उशीर करून चालणार नाही. यामध्ये ज्यादा रेल्वेगाड्या, बसेस्, समुद्री वाहनें यांच्या सेवांचा समावेश असेल. पूर्व-पश्चिम जोडणारे रस्ते, त्याचप्रमाणे गर्दीच्या क्षेत्रांत पूरक म्हणून चक्राकार मार्गाने जाणाऱ्या छोट्या बसेस सतत चालू हव्यात. विशेषकरून मध्यवर्ती व्यापार क्षेत्रांत खाजगी वाहनांवर प्रतिबंध आणि वाहनें 'पार्किंग'चे भाडे दंड वाटेल इतके मोठे कायद्याने केले पाहिजे.

शेवटी पण महत्वाचे म्हणजे आपल्याला अतिक्रमण न झालेली उद्यानें व मोकळ्या जागा अधिक वस्तुसंग्रहालये - ज्यामध्ये या शहराचा अद्वितीय इतिहास, समुद्री बंदराची कार्यक्षमता, नाटकें, सिनेमा, वस्त्रोद्योग, कला, संस्कृती यांची दालनें असतील - यांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे पुढील पिढ्यांसाठी आपला सांस्कृतिक वारसा आणि वास्तू जीर्णोद्धार व त्यांचे जतन करणे हेही महत्वाचे आहे. यामध्ये नाटक, नृत्य इत्यादी कला, ग्रंथ, हस्तलिखितें, कलात्मक वस्तु व पुराणकालीन वस्तु यांचा समावेश आहे.

मुंबईला जर भारतांतील क्रमांक एकचे शहर पुन: एकदा बनवायचे असेल तर वरील कल्पना प्रत्यक्षांत आणायची दृढ इच्छा ही फक्त राजकारण्यांनीं व सरकारी अधिकाऱ्यांनीं दर्शविली पाहिजे असं नसून सर्व नागरिकांनीपण दर्शविली पाहिजे. आतां एक उत्साहवर्धक गोष्ट आहे व ती म्हणजे अनेक बिनसरकारी संस्था (एन.जी.ओ.) विनामूल्य कायद्याची मदत, माहितीचा अधिकार (राइट टू इन्फॉर्मेशन अॅक्ट) व प्रसिध्दी माध्यमांकडून प्रसिध्दीच्या आधारे सत्ताधाऱ्यांकडून जबाबदार वागणुकीची मागणी करीत आहेत आणि सत्ताधाऱ्यांविरूध्द भ्रष्टाचार व बेकायदेशीरपणा याबाबत यशस्वी जनहित याचिका सादर करीत आहेत.

**अनुवाद : डॉ. वि. म. वैद्य**

■ ■ ■ ■ ■

